**शासनमान्य ग्रामपंचायत ग्रंथालयांना सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामधील पहिल्या हप्त्यासाठी सहायक अनुदाने (अनिवार्य) वितरीत करणेबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन ज्ञापन क्रमांक-मराग्रं-२०२६/प्र.क्र.१३२/ई-१७८०४५३/ग्रं.क.**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १३ ऑक्टोबर, २०२६.

**वाचा :-** १) ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय यांचे पत्र जा.क्र.३२/२०२६-२७ /ई.३४४२८१८, दि.२३.०७.२०२६.

**ज्ञापन :-**

ग्रंथालय संचालनालयाने उपरोक्त वाचा येथील पत्राव्दारे शासनमान्य ग्रामपंचायत ग्रंथालयांच्या पहिल्या हप्त्याच्या परिरक्षणासाठी रु.१,००,८६,३३३/- (अक्षरी रुपये एक कोटी शहाऐंशी हजार तीनशे तेहत्तीस फक्त) अनुदान वितरीत करुन खर्च करण्यास मान्यता देण्याची विनंती केली होती.

२. सन २०२६-२७ मध्ये शासनमान्य ग्रामपंचायत ग्रंथालयांच्या अनुदानाचा पहिला हप्ता अदा करण्यासाठी रु.१,००,८६,३३३/- (अक्षरी रुपये एक कोटी शहाऐंशी हजार तीनशे तेहत्तीस फक्त) इतका निधी ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना खालील अटी व शर्तीच्या अधीन वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे :-

अ) सदर खर्च करण्यासाठी लेखाधिकारी, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच, सदर खर्चाकरीता "नियंत्रक अधिकारी" म्हणून संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे राहतील.

ब) ज्या कारणासाठी निधी मागणी केली आहे त्याच कारणासाठी निधी खर्च होत असल्याची खातरजमा करण्याची सर्वस्वी जबाबदारी संचालक, ग्रंथालय संचालनालय यांची राहील.

क) प्रस्तावित निधी वितरीत करताना विहीत कार्यपध्दतीचे अनुपालन करण्याची दक्षता संचालक, ग्रंथालय संचालनालय यांची राहील.

ड) सदर खर्च मागणी क्रमांक डब्ल्यू-४, २२०५ कला व संस्कृती, १०५ सार्वजनिक ग्रंथालये. (०४) स्थानिक क्षेत्राखालील योजना, (०४) (०१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम १०० अन्वये जिल्हा परिषदांना सहाय्यक अनुदाने

(ग्रामपंचायत ग्रंथालयांना सहाय्यक अनुदाने) (२२०५ ११९६) (अनिवार्य) ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशीर्षाखाली सन २०२६-२७ मध्ये उपलब्ध तरतूदीतून भागविण्यात यावा.

इ) अनुदानाच्या रकमेचे उपयोगिता प्रमाणपत्र ग्रंथालय संचालक यांनी सादर करणे आवश्यक राहिल.

३. सदर शासन ज्ञापन वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र.६१९/व्यय-५, दि.०१.१०.२०२६ नुसार मिळालेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२६१०१३१३१३१३१७०८ असा आहे. हे ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DR SHRIKANT LAXMANRAO PULKUNDWAR

Digitally signed by DR SHRIKANT LAXMANRAO PULKUNDWAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELMD, 2.5.4.20=FEB24B5F5D1512BB47F7BAE5AD1DB4953358CD43C999BDF0814C6BB78364D50A, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C10A1E6C8FBE08C1180978BD3ED8A151ED05202D522B09B9960341C2F080906D, cn=DR SHRIKANT LAXMANRAO PULKUNDWAR
Date: 2026.10.13 13:14:08 +05'30'

**( डॉ.श्रीकांत पुलकुंडवार )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
५. महालेखापाल-१/२ (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
६. ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
८. सर्व सहायक ग्रंथालय संचालक / जिल्हा ग्रंथालय अधिकारी (ग्रंथालय संचालनालयामार्फत)
९. कार्यासन, व्यय-५/अर्थ-८, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.अवर सचिव, अर्थसंकल्प, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
११.निवड नस्ती (ग्रंथालय कक्ष), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.